Rotary
2020-2021

# southern star ...अवघे धरू सुपंथ

*The official bulletin of Rotary Club of Pune South*

Year : 51, Vol : 4, October 2020

**WHEN YOU SEE
SOMETHING BEAUTIFUL
IN SOMEONE,
TELL THEM.
IT MAY TAKE
A SECOND TO SAY,
BUT FOR THEM, IT COULD
LAST A LIFETIME.**

**President :** Rtn. Sudarshan Natu | **Secretary :** Rtn. Manisha Belgaonkar | **Editor :** Rtn. Yogesh Nandurkar

## *Economic and Community Development Month*

Rtn. Abhijit Deshpande (AB)

At no other time has this theme been more critical and relevant than in the current COVID-19 scenario.

The pandemic has not only threatened the economic health and survival of communities around the world but also created a direct threat to life. Everyone needs to do their bit to help each other. Here are some simple things that we can do in everyday life to enhance economic and community development:

a) Support entrepreneurs and small businesses in the community with technical and commercial know-how and market connects.

b) Purchase goods and supplies locally to stimulate the economy. We can do this for our service projects as well.

c) Expand vocational training opportunities, including job placement programs.

d) Partner with organisations which provides training to communities using the locally available skills and resources.

e) Provide equipment, supplies and know-how to cooperatives and self-help groups to increase production and sales in the local market.

Every community has different needs and opportunities to serve.

Read the 'Economic and Community Development Project Strategies' guide book from Rotary International here:

Economic and Community Development Project Strategies

Watch this inspiring story of how Rotary helped improve the economic conditions of the Maheshwari silk saree weavers' community....

# *Rotary's Dream Girl – Jennifer*

Rtn. PDG. Arun Kudale

Enjoy listening....



**Jennifer E. Jones**

Rotary International was established in 1905 as the male dominated service organisation. The Supreme Court of USA on 4th May 1987, asked the Rotary International to accept female members in Rotary. In 1989, the RI's Council on Legislation passed the resolution that the words 'male only' will be deleted from the provisions of eligibility for membership. The official induction of female members in the Rotary Clubs started thereafter. Rotary waited for a long to see the female Rotarian at the helm of the affairs. In the recent meeting of RI President's Nomination Committee, the members unanimously nominated Rtn. Jennifer E. Jones for the post of the President of Rotary International for the Rotary year 2022-2023. Her nomination went unchallenged and she was declared as the RI President Nominee on 1st October 2020. This has created history in the 115 years old organisation which has elected the Lady Rotarian as the President of RI for the first time.

Jennifer E. Jones is the member of Rotary Club of Windsor-Roseland, Ontario, Canada (RID 6400). She is currently The Rotary Foundation Trustee and has served as RI Vice President, Director, Training Leader, Committee Chair, Moderator, and District Governor. She played a lead role as the Chair to strengthen Rotary's Advisory Group. She is the Co-Chair of the 'End Polio Now Countdown to History Campaign Committee,' which aims to raise One Hundred Fifty Million Dollars for polio eradication efforts. Jones recently raised the critical funds for COVID-19 relief activities.

Jennifer Jones is the recipient of RI's 'Service Above Self' Award and The Rotary Foundation Citation for 'Meritorious Service.' She and her husband, Nick Krayacich, are members of The Rotary Foundation's Arch Klumph Society, Paul Harris Society and the Bequest Society.

Jennifer Jones has done the Doctorate in law and she works in the media business. She is the Founder President of 'Media Street Productions Inc.,' an award-winning media company in Windsor, Canada. She was the Chairperson of the Board of



DG Rashmi Kulkarni, Rtn. Vinay kulkarni & Jennifer E. Jones

Governors of the University of Windsor and also of the Windsor-Essex Regional Chamber of Commerce. She has been recognized for her service with the YMCA Peace Medallion, the Queen's Diamond Jubilee Medal, and Wayne State University's Peacemaker of the Year Award, bestowed for the first time on the Canadian citizen.

One of the Rotary International's most powerful speakers and recognized communicators, Jennifer has presented keynote addresses and training workshops at hundreds of conferences across North America and in Russia, Panama, Thailand, Portugal, Finland, India, Sri Lanka, Spain, Australia, New Zealand, Fiji, England, Korea, Taiwan, Brazil, Greece, Italy and Germany.

Jennifer is happily married to Nick Krayacich a local Family Physician. They share a love for many things including travel, cycling, golf and relaxing at their family cottage. They share a thirst for adventure and reached the summit of Mount Kilimanjaro in Tanzania, Africa in January 2009.

Shobha and I had an opportunity to meet and greet her briefly in Rotary International's Convention in Hamburg, Germany in June 2019. She likes to hug her friends in western style, while greeting them. She is a charming lady, eager to meet people and make friends with. She was expected to be the President of RI, but we had no idea that the day will come so soon.

She is truly the Dream Girl of Rotary and has genuinely brought the weather of change in Rotary.


- रोटरीनं प्रत्येक महिना विशिष्ट कामासाठी योजला आहे. त्याबद्दल महत्त्व आणि काय करायचं हे सांगणारं पान
- शिवाय रोटरी इंटरनॅशनलबद्दल काही विशेष

तुमचा लेख आवर्जून द्या..
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

रोटरी

## *RRN is Now RMB-PBC*

Rtn. Abhijit Deshpande (AB)

RRN (Rotarian's Referral Network) was our district's vocational fellowship. It was a business referral network of Rotarians for Rotarians. It was in action since 2015 and has helped Rotarians to do business worth crores of Rupees amongst each other. In the mean while, a RI fellowship Rotary Means Business (RMB) became active. It has a similar concept as RRN. Therefore, to maintain synergy, it was decided to convert RRN into a new Chapter of RMB. Incidentally it turned out to be the 100th Global Chapter of RMB and it was named as "Pune Business Circle". The Chapter has 105 members from more than 40 Rotary Clubs across Pune. Rtn. Pradip Patil is the Chairman of this Chapter and our Rtn. Anand Kulkarni is the Secretary. We wish a great success to this Chapter.



- आपला क्लब रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मध्ये येतो.
- डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रश्मी कुलकर्णी यांचा संवाद
- या डिस्ट्रिक्टमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम
- डिस्ट्रिक्टमधील क्लबसचे महत्त्वाचे, दखलपात्र असे प्रोजेक्ट्स

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

डिस्ट्रिक्ट कनेक्ट

# अजिंठा – एक अद्भुत कालातीत कलाविष्कार

रो. रवींद्र प्रभुणे



**वक्ते – प्रा. डॉ. शार्वेय धोंगडे**
**दिनांक– ७ सप्टेंबर २०२०**

प्रत्येक भारतीयाला अजिंठा वेरूळची लेणी जगप्रसिद्ध आहेत याचा सार्थ अभिमान आहे पण या प्रसिद्धी पलीकडे त्यांची खरी ओळख प्रत्येकाला असतेच असं नाही म्हणून ७ सप्टेंबरच्या साप्ताहिक कार्यक्रमात प्राध्यापक डॉक्टर शार्वेय धोंगडे यांचं व्याख्यान आयोजित केलं होतं. विषय होता 'अजिंठा – एक अद्भुत कालातीत कलाविष्कार,' विषयाचं शीर्षक सुबकपणे मांडलं होतं.

शिक्षणानं आणि व्यवसायानं एक आघाडीचे वास्तुविशारद (आर्किटेक्ट), मनाने कलासक्त आणि पेशानं प्राध्यापक असलेल्या डॉक्टर शार्वेय धोंगडे यांच्यापेक्षा सुयोग्य व्यक्ती या निरुपणासाठी मिळाली नसती.

एका वास्तुविशारदाच्या भूमिकेतून अजिंठा लेण्यांची रचना कशी आहे, त्याचं बांधकाम कसं केलं गेलं असेल याचं शास्त्रीय आणि बारकाव्यांसहित विवेचन त्यांनी केलं. त्यांच्या कलासक्त मनाला तेथील चित्रकला आणि शिल्पं अधिक भावली. त्यांतील विविधता, विषय, आशय, व्यक्ती, भावभावनांची अभिव्यक्ती, रंगरेषांची योजना, सुंदर, सुडौल, मोहक प्रमाणबद्धता असे अनेकानेक पैलू त्यांनी सविस्तरपणे उलगडून दाखवल्यानंतर या कलेचा आवाका लक्षात आला आणि त्याला अद्भुत का म्हणतात याचं प्रत्यंतर आलं. प्रत्येक कालखंडाशी सुसंगत असा हा कलाविष्कार त्यातील अंगभूत गूढतेसोबत जेव्हा आपली नाळ पारलौकिक तत्त्वाशी जोडतो तेव्हा तो आपोआपच कालातीत बनून राहतो.

त्यांच्या बोलण्यातून असं लक्षात आलं की, विषयाचा आवाका तासाभरात मांडता येणं केवळ अशक्य आहे. या सागरात जितकी खोलवर बुडी मारू तितकी अधिक रत्नं हाताशी लागतात आणि ती आपल्या फाटक्या झोळीत सामावू शकत नाही... या अगतिकतेची जाणीव अधिकच होत राहते.

वेळे अभावी विषयाला पूर्णपणे न्याय देऊ शकत नाही याची खंत व्याख्यात्याबरोबरच श्रोत्यांनाही झाल्याचं जाणवलं. याची भरपाई कशी करायची... तर याच विषयावर आठदहा व्याख्यानांची व्याख्यानमाला, त्यानंतर डॉ. धोंगडेंच्या सोबतीनं अजिंठाला भेट देऊन तो आनंद अनुभवणं, त्यानंतर चिंतन करून त्या अनमोल ठेव्याची अद्भुतता आणि कालातीतता अनुभवायची आणि एक चिरस्मरणीय आनंदानुभव जतन करायचा असा एक विचार झाला.

कार्यक्रमाचा रेकॉर्डेड व्हिडिओ येथे पाहा.

## *Members Activity Day*

### रो. श्वेता करंदीकर

**दिनांक – १४ सप्टेंबर २०२०**




सोमवार १४ सप्टेंबर २०२० रोजी बुलेटिन कमिटीने विशेष रंगारंग कार्यक्रम 'MAD' सादर केला. MAD म्हणजे "Members Activity Day." आपल्या क्लबमधील सर्व सभासद आणि ॲनेट्स यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

कार्यक्रमाची सुरुवात रो जितेंद्र महाजन यांची मुलगी मधुरा आणि मुलगा मिहीर यांच्या जेम्बे या आफ्रिकन तालवाद्य वादनानं झाली. मधुरा आणि मिहीर, दोघंही एक वर्ष हे वाद्य शिकत आहेत. त्यांच्या धडाकेबाज वादनाच्या ठेक्यावर उपस्थितांनीही ताल धरला.

त्यानंतर रो. अभिजीत देशपांडे यांनी मॅडमास्टर हे हलकं फुलकं रोटरी क्वीझ घेतलं. आपल्या क्लबविषयी आणि त्यातल्या सभासदांविषयी आपल्याला किती माहिती आहे हे सगळ्यांनी पडताळून पाहिलं. नंतर झालेल्या बॉलीवूड क्वीझमध्ये अभिजीतने सगळ्यांनाच कार्यक्रमात सहभागी करून घेतलं.

क्वीझनंतर झालेल्या 'हसवणुक' या कार्यक्रमात रो. मिलिंद क्षीरसागर आणि रो. विवेक वेलणकर यांनी मजेदार किस्से सांगून सगळ्यांची हसवणूक केली.

कार्यक्रमाच्या शेवटी रो. संदीप कुलकर्णी यांची मुलगी रिद्धी कुलकर्णी हिनं 'पोल्युशन' या विषयावर तिची मतं मांडली. तसंच तिने आर्जव ही संजीवनी बोकील यांची कविता सादर केली.

रो. श्वेता करंदीकर हिने कार्यक्रमाचं सूत्रसंचालन केलं होतं.

बुलेटिन कमिटीमधील सर्वच सदस्यांनी कार्यक्रम नीटनेटका होण्यासाठी मेहनत घेतल्यामुळे कार्यक्रम खूप दर्जेदार झालाच पण सर्वच सभासदांनी उत्स्फूर्त सहभाग घेतल्यामुळे कार्यक्रमाला खरी रंगत आली.

## इतिहास हा विषय का शिकायचा? इतिहासाकडून काय शिकायचं?

**वक्ते – श्री. अमृत भट**

**दिनांक – २१ सप्टेंबर २०२०**

व्यासंगी इतिहास अभ्यासकाकडून इतिहास शिक्षणाचं महत्त्व समजून घेणं ही पर्वणीच असते म्हणूनच २१ सप्टेंबरच्या साप्ताहिक सभेत श्री. अमृत भट यांचं व्याख्यान आयोजित केलं होतं.

रो. विलास आपटे आणि न अस्मिता आपटे यांची पुतणी अपूर्वा आपटे यांनी वक्ते श्री. अमृत भट यांचा परिचय करून दिला. त्या ज्ञान प्रबोधिनीच्या विद्यार्थिनी आहेत.

श्री. अमृत भट हेही ज्ञान प्रबोधिनीचे विद्यार्थी. त्यांनी इतिहास आणि शिक्षणशास्त्र या दोन्ही विषयांत पदव्युत्तर शिक्षण घेतलं आहे. शांतिलाल मुथा फाउंडेशनमध्ये मूल्यवर्धन प्रकल्पाच्या अधिकारीपदी काम केलं आहे. सध्या ते प्रबोधिनीच्या हराळी केंद्रावर भटक्या विमुक्त मुलांसाठी राबवल्या जात असलेल्या शैक्षणिक प्रकल्पांचं काम बघतात.

त्यांनी प्रश्नोत्तरं आणि स्लाईड शोद्वारे इतिहास या विषयाची तंत्रशुद्ध माहिती दिली. इतिहास म्हणजे गतकालीन मानवी जीवनाची कथा. मानवी जीवनाच्या अखंड प्रवाहातून सतत नवीन इतिहास घडत असतो. संशोधकांनी इतिहास लेखन बौद्धिक उंचीवर नेऊन ठेवलं आणि इतिहास हा शैक्षणिक अंगानं लिहिला गेला त्यामुळे उपयुक्ततावादी सामान्य माणसाला तो आवडेनासा झाला.


इतिहास शिक्षणाचं महत्त्व सांगताना ते म्हणाले की, इतिहास माणसाचं निखळ मनोरंजन करतो. इतिहास उदाहरणं देऊन ज्ञान देतो. पूर्वीपेक्षा अधिक चांगलं जगण्यासाठी, प्रेरणा घेण्यासाठी, काय करायचं नाही हे कळण्यासाठी, जिज्ञासा पूर्तीसाठी, व्यक्तिमत्व विकासासाठी इतिहास अवश्य शिकला पाहिजे. इतिहासामुळे दूरदृष्टी वाढते.

भट सरांनी त्यांच्या संशोधन प्रकल्पासाठी गुजरातमधल्या शाळेत सहावी ते दहावीच्या मुलांसाठी एक प्रकल्प राबवला. 'मुलांना इतिहास का आवडत नाही?' असा विषय निवडला. विद्यार्थी आणि शिक्षकांच्या मुलाखती आणि निरीक्षणं यांतून समजलं की, इतिहास शिकवण्याची पद्धत मुलांना आवडत नाही. मुलांना सनावळी पाठ करायला लावल्या जातात. त्यात मुलांना रस नसतो. इतिहास समजून घेण्याचा दृष्टिकोन खूप कमी असतो. इतिहास अध्यापनामध्ये प्रचलित पद्धत आणि इतर पर्यायांचा विचार करता नाटक, चित्रपट या माध्यमांचा सुयोग्य वापर करून इतिहास रंजकतेनं शिकवता येईल.

इतिहास माणसाला निरंतरता आणि बदल, कारण आणि संबंध, मानवी समाजानं पुढे कसं जायचं, जगाकडे कसं बघायचं, इतिहासाची पुनरावृत्ती टाळत आजचा वर्तमानकाळ सुधारण्यासाठी कसे प्रयत्न करायचे हे शिकवतो.

दोन पिढ्यांचा दुवा साधत युवा अभ्यासकानं इतिहास शिक्षणाचं महत्त्व समजावून सांगितल्यानं सभासदांनी त्यांचं विशेष कौतुक केलं.

कार्यक्रमाचा रेकॉर्डेड व्हिडिओ येथे पाहा.




## नॅशनल एज्युकेशन पॉलिसी – २०२०

**वक्ते – डॉ. अर्चना सुदामे, नमिता जोशी**
**दिनांक – २८ सप्टेंबर २०२०**

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय आणि उच्च शिक्षणाच्या रचनेत आमूलाग्र बदल करण्यात आले. यासाठी अनेक शिक्षणतज्ज्ञांनी धोरणपत्रिका तयार केल्या आणि त्यांना मान्यताही मिळाली. या सर्व विषयांची सविस्तर माहिती देण्यासाठी २७ सप्टेंबरच्या साप्ताहिक सभेसाठी शिक्षणतज्ज्ञ डॉ. अर्चना सुदामे आणि नमिता जोशी यांना आमंत्रित केले होते.

पीपी अनिलदा सुपनेकर यांनी डॉ. अर्चना सुदामे आणि नमिता जोशी यांच्या कार्याचा परिचय करून दिला.


अनिलदा सुपनेकर यांची कन्या, शिक्षणशास्त्र अभ्यासक डॉ. अर्चना सुदामे यांनी एन्व्हायरनमेंटल मायक्रोबायोलॉजी या विषयात पीएचडी केलेली आहे. महाविद्यालयीन शिक्षण आणि करिअर सल्लागार म्हणून त्या परिचित आहेत. उच्च शिक्षण घेणाऱ्या तीन हजार सहाशे विद्यार्थ्यांना त्यांनी आत्तापर्यंत मार्गदर्शन केले आहे.

नमिता जोशी यांनी 'पब्लिक पॉलिसी' या विषयांतर्गत पुणे विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी आणि एज्युकेशन आणि डेमॉक्रसी या विषयातही इंग्लंडमधून पदव्युत्तर पदवी मिळवली. सुरुवातीला काही काळ त्या जर्मन भाषा शिकवत होत्या. 'डेमोक्रॅटिक प्रॅक्टिसेस विदीन एज्युकेशन' या विषयातील प्रावीण्यामुळे त्या युकेमधील नामवंत संस्थांशी संलग्न आहेत. 'आत्मन ट्रेनिंग सेंटर'द्वारे सुमारे दोनशे विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करतात आणि स्वतंत्र व्यवसायही करतात.

पुणे इंटरनॅशनल सेंटरने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला अनुसरून 'रेकमेंडेशन्स फॉर ड्राफ्ट नॅशनल एज्युकेशन पॉलिसी' याविषयी पॉलिसी पेपरच्या लीड ऑथर म्हणून डॉ. अर्चना सुदामे यांनी नमिता जोशी यांच्याबरोबर काम केले. नमिता जोशी त्यांच्याबरोबर एडिटोरिअल कोऑर्डिनेटर म्हणून काम करत आहेत.

२०१९मध्ये पुणे इंटरनॅशनल सेंटरने सादर केलेल्या 'नर्चरिंग गिफ्टेड स्टुडन्ट्स' या विषयावर या दोघींनी दुसरी एक

धोरणपत्रिका सादर केली २०१६मध्ये त्यांनी ज्या धोरणपत्रिका सादर केल्या होत्या त्यांतील अनेक पत्रिका नॅशनल एज्युकेशन पॉलिसीमध्ये अंतर्भूत केल्या गेल्या.




डॉ. अर्चना सुदामे आणि नमिता जोशी यांनी स्लाईड शोमधून सविस्तर माहिती दिली. शालेय शिक्षणाची रचना दहा अधिक दोनऐवजी पाच अधिक तीन अधिक तीन अधिक चार; मातृभाषेत प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य; सहावीनंतर व्यावसायिक शिक्षण; बहुभाषिक शिक्षण; बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक विकासासाठी आवश्यक सुविधा; शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे; नववी ते बारावी एकत्र करून चार वर्षांचा कोर्सअंतर्गत आंतरशाखीय शिक्षण; शिक्षकांना विशेष प्रशिक्षण आणि मूल्यमापन; एमफीलऐवजी थेट पीएचडीसाठी प्रवेश; उच्च शिक्षणातील विविध अभ्यासक्रमांसाठी एकच नियामक मंडळ; शैक्षणिक मूल्यवर्धन; मूल्यांकन; तसेच नियोजन; प्रशासन यांसाठी तंत्रज्ञानाचा वापर यांतून शिक्षण चौकटबाह्य, आंतरशाखीय आणि समन्वयी करण्यात आले आहे.

हे सर्व या विदुर्शींकडून ऐकताना, ‘विद्वान सर्वत्र पूज्यते ।’ या उक्तीचा प्रत्यय येत होता. त्यांनी शैक्षणिक धोरण, सुधारणा अतिशय सोप्या भाषेत समजावून सांगितल्याबद्दल श्री. विवेक वेलणकर यांनी आभार मानले.

कार्यक्रमाचा रेकॉर्डेड व्हिडिओ पाहा.


➢ **क्लबच्या साप्ताहिक सभांचा सभेनुसार**

## साप्ताहिक सभा

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**एके / यामिनी पोंक्षे**

## CONGRATULATIONS!

## IPP Abhijit Joag, BoD & Members...!




*Platinum ranking for Rotary Club of Pune South*

## मेगा इ-रायला

**ॲन विनिता कुलकर्णी**

रोटरी क्लब ऑफ कल्याणीनगरने २७ ऑगस्ट रोजी 'मेगा इ-रायला'चा प्रोग्राम होस्ट केला होता. त्यात इतर सिनर्जी पार्टनर्स असलेले चौदा रोटरी क्लब सहभागी झाले होते. हा प्रोजेक्ट अठरा ते तीस या वयोगटातल्या मुलांसाठी होता. या कार्यक्रमासाठी बावीसशे मेंबर्सनी रजिस्ट्रेशन केलं होतं. या उपक्रमात रोटरी क्लब पुणे साऊथचासुद्धा महत्त्वपूर्ण सहभाग होता.

रो. सुदर्शन नातू यांच्यामुळे पंढरपूर येथील एसव्हीइआरवाय कॉलेजमधील विद्यार्थी, रो. श्रीकृष्ण चितळे यांच्यामुळे स. प. कॉलेजचे विद्यार्थी आणि इतर रायला टीम्सच्या प्रयत्नांमुळे आपल्या क्लबमार्फत सुमारे अकराशे विद्यार्थ्यांचं रजिस्ट्रेशन झालं. या उपक्रमासाठी पुणे, पनवेल, चेन्नई, श्रीलंका, मलेशिया, यूएसए अशा विविध ठिकाणांहून स्टुडंट्स, रोटरॅक्टर्स, इंटरॅक्टर्स आणि इतर मेंबर्सचा चांगला प्रतिसाद मिळाला.

प्रोग्रॅमची सुरुवात प्रेसिडेंट मेघा शर्मा (रोटरी क्लब कल्याणीनगर) आणि प्रमुख पाहुण्या रो. डि. जी. रश्मी कुलकर्णी यांच्या भाषणाने झाली.

अवी आर्या हे या कार्यक्रमाचे पहिले वक्ते होते. त्यांचा बोलण्याचा विषय होता 'रीन्यू.' त्यांनी आजच्या बदलत्या काळात स्मार्टफोन, डिजिटल मार्केटिंग, ऑनलाईन प्रेझेन्स याचं महत्त्व समजून सांगितलं, तसंच ऑनलाइन प्रेझेन्ससाठी '३३ मायक्रो व्हिडिओज इन २० डेज' ही आयडिया त्यांनी सर्वांसमोर मांडली. त्यांनी नवीन बिझनेसला उपयोगी पडतील अशा टिप्स दिल्या आणि आर्थिक साहाय्यासाठी कुणीकडे शोध घ्यावा याविषयी त्यांनी मार्गदर्शन केलं.

दुसरे वक्ते डॉक्टर राधाकृष्ण पिलाई 'रिडायरेक्ट' या विषयावर बोलले. चाणक्य नीतीच्या चार तत्त्वांना अनुसरून काम केल्यास तुम्ही उत्तम नेता बनू शकता याबद्दल अतिशय सुंदर माहिती त्यांनी दिली.





अविनाश आनंदा हे पुढील वक्ते होते. त्यांच्या बोलण्याचा विषय 'रिचार्ज' हा होता. हसरा चेहरा ही आनंदी राहण्याची गुरुकिल्ली आहे. 'आनंदी राहिल्याने कुठल्याही गोष्टीत यश मिळवणं सोपं जातं' असा सुंदर विचार त्यांनी सर्वांना दिला.

रो. मेघा यांची उत्तम आखणी, तज्ञ वक्ते, उपयुक्त विषय, भरघोस मेंबरचा सहभाग यांमुळे लक्षात राहील असा हा कार्यक्रम झाला. आपल्या क्लबतर्फे प्रे. सुदर्शन यांच्या प्रयत्नांमुळे अनेक विद्यार्थी सहभागी झाल्याने हा प्रोग्राम खूपच वैशिष्ट्यपूर्ण ठरला.

| Row Labels | Count of Please select any one of the below.2 |
|---|---|
| Learn and Play School | 51 |
| Pune south | 2 |
| Rotaract Club of Poona South | 21 |
| Rotaract Club Of Tech Terrain College | 130 |
| Rotary Club of Daund | 37 |
| Rotary Club of Hadapsar Central | 28 |
| Rotary Club of Panvel Mahanagar | 6 |
| Rotary Club of Pune Baner | 4 |
| Rotary Club of Pune Cantonment | 64 |
| Rotary Club of Pune Pride | 39 |
| Rotary Club of Pune South | 1258 |
| Rotary Club of Pune Sunrise | 14 |
| Rotary club of Rajgurunagar | 272 |
| Rotary club Pandharpur | 2 |
| Rotary Club Panvel Central | 14 |
| Rotary Club Pune Tilak Road | 10 |
| Rotary Pimpri Town | 29 |
| Rotary Pune Tilak Road | 30 |
| Grand Total | 2011 |

## काका - एक जिवलग सखा

**रो. पीडीजी. अरुण कुदळे**

ऐकू या....



**काका सावंत**

सोमवार २४ ऑगस्टची दुपार नुकतीच वामकुक्षी संपवून, चहा घेऊन मी परत ऑफिसला जाण्याच्या तयारीत होतो. तेवढ्यात माझा फोन खणाणला आणि 'मी डॉक्टर अविनाश भोंडवे बोलतोय. एक दुःखद बातमी सांगण्याकरता फोन केलाय' असा आवाज पलीकडून आला. क्षणभर माझ्या काळजाचा ठोका चुकला आणि आता काय दुःखद बातमी ऐकायला लागते असा प्रश्न मला पडला. माझ्या पत्नीनं शोभानं माझ्या चेहऱ्यावरचे भाव ओळखले आणि 'शांततेनं घ्या' असं तिनं हातानं मला खुणवलं. पलीकडून आमचे रोटेरिअन डॉक्टर भोंडवे सांगत होते, 'अहोऽ काका आपल्याला सोडून गेले' डॉक्टर भोंडवे हे आमच्या जिवलग मित्राचे म्हणजे काका सावंतांचे जावई असल्यामुळे ते कोणाबद्दल बोलतायत हे मला लगेच समजलं आणि माझ्या तोंडून शब्द बाहेर पडले, 'अहोऽ काय सांगताय? कोण? आपले काका सावंत? माझं चारच दिवसांपूर्वी त्यांच्याशी फोनवर चांगलं अर्धा तास बोलणं झालं. एकदम ठणठणीत तब्येत होती आणि अचानक हे कसं काय झालं?'

पलीकडून अविनाशजी बोलत होते.

आणि मी सुन्नपणे ऐकत होतो.

दुपारी तीन वाजता रुटीन चेकअपसाठी काका डॉक्टरांच्या शिवाजीनगरच्या दवाखान्यात गेले होते. त्यांनी केलेल्या काही वैद्यकीय

चाचण्यांचे रिपोर्टही त्यांना डॉक्टरांना दाखवायचे होते. अतिशय शिस्तीचे असलेले काका दवाखान्यात थोडी गर्दी होती म्हणून आपला नंबर येईपर्यंत गाडीतच बसून होते. त्यांचा नंबर आल्यानंतर गाडीतून उतरून डॉक्टरांच्या केबीनपर्यंत ते चालत गेले आणि केबीनच्या दारातच कोसळले. काकांना मॅसिव्ह हार्ट अटॅक आला होता. डॉक्टरांच्या ते लगेचच लक्षात आलं आणि ते काकांना घेऊन त्यांच्या सुनेसोबत सूर्या हॉस्पिटलला गेले. तिथं डॉक्टरांच्या टेबलवर पोहोचेपर्यंत काकांनी दम धरला होता पण टेबलावर पोहोचताच क्षणी खेळ संपला थोड्या वेळानं तिथूनच अविनाशजींनी मला फोन केला होता.

काकांची आणि माझी अठ्ठेचाळीस वर्षांची मैत्री होती.

आम्ही १९७२ सालापासून एकमेकांचे परिचित होतो. स्वभावामुळे एकमेकांचे सूर जुळत गेले आणि केव्हा आमची मैत्री वाढत गेली ते कळलंच नाही. आम्ही दोघंही मेट्रॉलॉजीच्या क्षेत्रातली उत्पादनं करत होतो पण एकमेकांचे स्पर्धक नव्हतो. काकांचा भर गेजेस करण्याकडे होता तर आम्ही इंस्ट्रुमेंट्सचं उत्पादन करत् होतो. पुष्कळदा आमचे ग्राहकही एकच असायचे आणि आमची उत्पादनं एकमेकाला पूरक असायची त्यामुळंही आमची मैत्री लवकर जमली असावी. माझं लग्न लवकर म्हणजे १९७१ साली झालं. काकांचं आणि लतावहिनींचं लग्न उशिरा म्हणजे १९७६ साली झालं. मित्रमंडळ सभागृहात त्यांच्या लग्नाप्रीत्यर्थ आयोजित केलेल्या स्वागत समारंभाला मी आणि शोभा, दोघंही उपस्थित होतो. काकांमधला आणि माझ्यातला एक समान दुवा म्हणजे आम्ही दोघंही पुण्याच्या सुप्रसिद्ध 'कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे (COEP)' या संस्थेचे विद्यार्थी. काका १९६४ला पास होऊन बाहेर पडले तर मी १९७०च्या बॅचचा विद्यार्थी पण वयातलं हे अंतर आमच्यात कधीच नव्हतं १९८२ साली आम्ही दोघंही रोटरीत आल्यानंतर ते अंतर आपोआपच गळून पडलं.

व्यवसायानिमित्त आम्ही दोघंही परदेशी औद्योगिक प्रदर्शनाला नियमित भेटी द्यायचो. १९८२ साली मराठा चेंबरच्या माध्यमातून मी पहिल्यांदाच जर्मनीला हॅनोव्हर येथील जगद्विख्यात मशीन टूलच्या प्रदर्शनाला भेट देण्यासाठी गेलो होतो. काकांची यूरोपची बहुतेक दुसरी–तिसरी खेप असावी. एस्.ओ.टी.सीने आयोजित केलेल्या या प्रवासात पुण्यातील सुमारे पन्नास साठ उद्योजक होते. आमचा मुक्काम हॅनोव्हरपासून दोन तासांच्या अंतरावर असलेल्या हॅम्बुर्ग शहरात होता. प्रदर्शनाचं ठिकाण आमच्या हॉटेलपासून बसने दोन तासांच्या अंतरावर होतं. आम्ही पाच दिवस हे प्रदर्शन पाहाणार होतो. प्रदर्शनाचा दुसराच दिवस होता. मी संध्याकाळी पाच वाजता प्रदर्शनातून बाहेर येऊन बसकडे निघालो पण बसच सापडेना झालं असं की, या प्रदर्शनाला अनेक बाजुंनी प्रवेशदारं होती. एका दारापासून दुसऱ्यापर्यंत जायला किमान पाऊण तास लागायचा. मी चुकीच्या प्रवेशदारानं बाहेर गेलो होतो. काकांनी आयोजकांना सांगून माझ्यासाठी पाऊण तास बस थांबवून ठेवली होती पण मला काही शेवटपर्यंत बस सापडली नाही. शेवटी माझी वाट पाहून बस निघून गेली. पुढे दीड तास वाहनतळावर हिंडल्यावर् मी बस शोधायचा नाद सोडून दिला. तेथील एका मुलीनं मला हॅनोव्हर रेल्वे स्टेशनपर्यंत लिफ्ट दिली आणि मी धडपडत रात्री अकरा वाजता आमच्या हॉटेलवर पोहोचलो. तिसऱ्या दिवशी प्रदर्शनावरून परत येताना काकांनी बसमध्ये माझ्या जाहीर फिरक्या घेतल्या. मी मुद्दामच बस चुकवली वगैरे वगैरे... आणि मला काल घडलेला प्रसंग संपूर्ण तासभर बसच्या माईकवरून सविस्तरपणे सांगायला लावला. याचा परिणाम असा झाला की, परदेशात चुकल्यानंतर गडबडून न जाता आपल्या मुक्कामावर परत येण्यासंबंधीची माझी भीती तर गेलीच पण इतरांनासुद्धा ती एक केस स्टडी झाली आणि त्यांचीपण अशा आपत्तीच्या प्रसंगी काय करायचं याची मानसिक तयारी झाली.

मी काकांच्या समवेत किमान आठदहा तरी परदेशवाऱ्या केल्या असतील. एकदा प्रदर्शन पाहायला आम्ही बर्मिंगहॅमला गेलो होतो. मी मुंबईवरून थेट गेलो होतो आणि काका स्वित्झर्लंडवरून येणार होते. त्यांच्यासोबत इलेक्ट्रोनिकाचे प्रकाश रत्नपारखी होते. त्या दोघांच्या रूम्स मी माझ्याच हॉटेलमध्ये बुक केल्या होत्या. त्यावेळी आंतरराष्ट्रीय मोबाईल फारसे वापरले जात नव्हते. माझं हॉटेल बर्मिंगहॅम एअरपोर्टजवळ होतं पण काका बर्मिंगहॅम रेल्वेस्टेशनला गेले. ते फक्त जागाच चुकले नव्हते तर हॉटेलचं नावपण चुकीचं लिहून घेतलं होतं. झालं आता कुठे शोधायचं? शेवटी त्यांनी माझ्या ऑफीसला फोन करून अचूक पत्ता घेतला आणि मला प्रेमानं शिव्यांची लाखोली वाहात दोघंही उशिरा हॉटेलवर आले. शेवटी ही चुकामूक आम्ही आपलं शब्दभांडार एकमेकांवर मुक्तपणे उधळत संध्याकाळी पेल्यात बुडवून साजरी केली हे वेगळं सांगायला नकोच.

आम्ही दोघांनी एकदा बँकॉकचं प्रदर्शन पाहण्यासाठी सहकुटुंब जाण्याचं ठरवलं. अशी परदेशातली प्रदर्शनं म्हणजे आमच्या दोघांकरता नवीन तंत्रज्ञान आत्मसात करायच्या कार्यशाळाच असायच्या. तिथं पाहिलेलं नवीन उत्पादन परत आल्यानंतर आपल्या कारखान्यात तयार करायचं असा माझा खाक्याच असायचा. प्रसंगी आमच्या उत्पादनाला अशा प्रदर्शनांतून गिऱ्हाईकसुद्धा मिळायचं. प्रदर्शनाच्या जागी पोहोचल्यानंतर आम्ही आपापली कामं स्वतंत्रपणे करायचो. दुर्दैवानं शेवटपर्यंत लता(उमा)वहिनींना बँकॉकचा व्हिसा

मिळू शकला नव्हता. त्यामुळे काकांनी त्यांचे मित्र अगरवाल यांना या ट्रिपला बरोबर घेतलं पण या ट्रिपमध्ये आमची भट्टी काही फारशी जमली नाही. मात्र या दहा दिवसांत पुण्याला उमावहिनींनी आमच्या मुलांची चांगली काळजी घेतली आणि त्यामुळे आम्ही ही ट्रिप निर्धास्तपणे केली. या दिवसांत आमची मुलं स्मिता, संग्राम आणि सुवर्णा यांची काकांच्या आणि उमावहिनींच्या विक्रम, जाई आणि पूनम यांच्याबरोबर समवयस्क असल्यामुळे आणि आमची घरंही जवळच असल्यामुळे चांगली मैत्री झाली.

काकांचा व्यावसायिक व्याप पुणे, कोल्हापूर इथे पसरलेला असल्यामुळे रोटरीसाठी त्यांना फार वेळ देता यायचा नाही पण उमावाहिनी मात्र सगळीकडे सहभागी असायच्या. रोटरीतील आम्ही सात जोडप्यांनी १९९५च्या सुमारास एकत्र केलेली दुसरी ट्रिप म्हणजे हिमालयातील चारधाम यात्रा. खर तर आम्हाला काकांनी आणि श्रीभाऊ पोफळेंनी या सहलीला खेचूनच नेलं. म्हटलं तर ती तीर्थयात्रा होती आणि म्हटलं तर हिमालयातील निसर्ग सौंदर्य निरीक्षणातून अनुभवलेल्या अप्रतिम नेत्रसुखाची अनोखी अनुभूती होती. या सहलीमुळे आम्ही सर्वजण खूप जवळ आलो.

काकांनी २००५-२००६च्या रोटरी वर्षात आपल्या रोटरी क्लब पुणे साऊथच्या अध्यक्ष पदाची धुरा सांभाळली होती. त्या वर्षात मात्र त्यांनी आणि उमावहिनींनी झोकून देऊन काम केलं. त्यांचं वर्ष हे आमच्या सर्वांच्या कायमचं लक्षात राहील. त्या वर्षी काकांनी क्लबची सहल कोल्हापूर, पन्हाळा आणि वीर बाजीप्रभू देशपांडे यांनी आपल्या अतुलनीय पराक्रमानं गाजवलेल्या पावन खिंडीत नेली होती. काकांनी कोल्हापूरला रोटरी सभासदांचा केलेला पाहुणचार झोडून आम्ही तृप्त झालो होतो. कोल्हापूरच्या पांढरा रस्सा, तांबडा रस्सा आणि मटणाची चव अजून आमच्या जिभेवर रेंगाळत आहे.

एकदा आम्ही दहा बारा रोटेरिअन आपले जुने सभासद, माजी अध्यक्ष दिलीप जोशी यांच्या वाई इथल्या नदीकाठच्या घरी ओव्हर नाईट सहलीला गेलो होतो. संध्याकाळनंतर फेलोशिपची धमाल चालू झाली. कृष्णा नदीचं पाणी शेजारूनच खळखळ वाहत होतं. मंद सुखावणारा वारा अंगावर घेत आमचं अपेय पान आणि अभक्ष भक्षण चालू होतं. गप्पाटप्पा चांगल्या रंगल्या होत्या. बोलता बोलता दिलीपरावनं सांगितलं की त्यांच्या घराजवळच वाईमधले प्रसिद्ध ज्योतिषी राहातात. काकांना ज्योतिषाचा भारी नाद होता. कधी त्या ज्योतिषाच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी निर्णय घेतले असतील असं मला वाटत नाही पण त्याला भविष्य विचारायची त्यांना भारी आवड. मला म्हटले, 'भाऊसाहेबऽ आपल्याला त्या ज्योतिषाकडं उद्या जायचंय.' मलापण थोडीशी आवड असल्यामुळं मी हो म्हटलं. सकाळी उठून पुण्याला यायची घाई असल्यामुळे मी ते रात्रीचे संभाषण विसरून गेलो होतो पण सकाळी नाष्टा, स्नान उरकून तयार झाल्यानंतर काकांनी आठवण करून दिली आणि त्यांच्या आग्रहाखातर आम्ही दोघंच त्या ज्योतिषाकडे जाऊन त्यांना दोन तास पिडून आलो. काकांचा जन्म अमावास्येचा होता. ते नेहमी म्हणायचे की ज्योतिषी अमावास्येला अपवित्र मानतात पण मी मात्र पवित्र मानतो. आणि खरंच दक्षिण भारतात अमावास्या हा पवित्र दिवस मानला जातो.

आम्ही १९९६ साली आमच्या बंगल्यात शिफ्ट झालो तेव्हा काका आणि उमावाहिनी एकदा येऊन गेले. आमच्या बंगल्याचं इंटिरियर आपलेच एक सभासद बळवंत गोगटे यांनी केलं होतं. काकांना ते एवढं आवडलं की त्यांनी त्यांच्या पुण्यातील आणि कोल्हापुरातील फ्लॅटचं आणि फॅक्टरी ऑफिसेसचं इंटिरियर बळवंत गोगटे यांच्याकडूनच करून घेतलं. काकांकडे गुणग्राहकता होती. त्यांना माणसांची पारख होती आणि सौंदर्य दृष्टीसुद्धा तेवढीच प्रखर होती.

आमचे सदाशिव पेठेतील बालमित्र नंदूशेठ गोराडे हे काकांचे व्याही. त्यांचे वडील तात्या गोराडे आणि आमचे वडील दादासाहेब जानी दोस्त. आमच्या वडलांनी १९३२ साली गोराड्यांच्या जागेत निंबाळकर तालमीजवळ पहिली गिरणी टाकली आणि तिथेच त्यांच्या व्यावसायिक जीवनाला सुरुवात झाली. पुढे नंदूशेठ कारभार पाहायला लागल्यावर ही जागा आम्हाला डेव्हलपमेंटसाठी पाहिजे म्हणून त्यांनी आमच्या मागे तगादा लावला. सुमारे आठदहा वर्षं कोर्ट-कचेऱ्या चालल्या होत्या. एकदिवस काकांचा फोन आला की नंदूशेठला घेऊन येतो आहे. काका मला म्हणाले, 'अहो भाऊसाहेबऽ माझा जावई तो तुमचा जावई. कशाला हे कोर्ट-कचेऱ्या करत बसताय? मिटवून टाका हे प्रकरण इथेच.' काकांच्या शब्दाखातर त्या जागेसंबंधीच्या आमच्या भावनांना आवर घालून मी आणि आमचे बंधू दीपक, आम्ही दोघांनी आमच्याच बालमित्राबरोबर इतके वर्षं चाललेलं भांडण अर्ध्या तासात मिटवून जागेचा ताबा देऊन टाकला. आज या गोष्टीला पाचसात वर्षं झाली असतील.

आमच्या या मित्राच्या आठवणी सांगाव्यात तेवढ्या थोड्याच आहेत. जेव्हा डॉक्टर अविनाशजींचा फोन आला तेव्हा हा आठवणींचा पट झरकन माझ्या डोळ्यांसमोरून गेला.

काकांच्या पवित्र स्मृतींस आमची भावपूर्ण आदरांजली!

# वृक्षारोपण - एक नम्र आवाहन

रो. रवींद्र प्रभुणे

मित्रहो,

चांबळी येथे पाणी पंचायतीबरोबर आपण वृक्षारोपणाचे दोन मोठे प्रकल्प राबवले आणि आगामी दोन वर्षीही ते राबवले जातील याची हमी पुढील दोन्ही निर्वाचित अध्यक्षांनी घेतली आहे.

वृक्षारोपणाचे प्रकल्प यशस्वी व्हायचे असतील तर झाडांचं योग्य प्रकारे संगोपन होणं आवश्यक आहे. पाण्याची सोय आणि संरक्षण यांची उत्तम व्यवस्था पाणी पंचायत करत आहे. त्याबरोबरच देखभालीसाठी किमान एका माणसाची आवश्यकता असते. ती जबाबदारी आपण उचलावी अशी रास्त अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी एका स्थानिक माणसाची नेमणूक केलेली आहे. त्याचा वार्षिक खर्च साधारणपणे नव्वद हजार ते एक लाखांपर्यंत अपेक्षित आहे.

माझे असं नम्र आवाहन आहे की, आपण सर्व पर्यावरणप्रेमी सभासदांनी आपला खारीचा वाटा उचलावा आणि आपली बांधिलकी व्यक्त करावी.

याची सुरुवात झाली असून खालील सदस्यांनी कमिटमेंट दिली आहे.

| | |
|---|---|
| १) पीपी. डॉ. सुधांशू गोरे | - रु. १०,५००/- |
| २) रो. रवींद्र प्रभुणे | - रु. ११,०००/- |
| ३) रो. माधुरी किरपेकर | - रु. ११,०००/- |
| ४) रो. नितीन कुर्ले | - रु. १०,५००/- (डिसेंबर) |
| ५) रो. संजीव ओगले | - रु. ५,५००/- |
| ६) ॲन स्नेहा ओगले | - रु. ५,५००/- |
| ७) फर्स्ट लेडी ॲन सुगंधा नातू | - रु. १०,५००/- |
| ८) ॲन मोहिनी नातू | - रु. १०,५००/- |
| ९) पीपी. विनायकराव देशपांडे | - रु. ५,५००/- |

(२८ सप्टेंबर २०२० पर्यंतची यादी)

तुम्हा सर्वांचे खूप खूप आभार. तुमच्या सहकार्याने वृक्ष संवर्धनाचे काम उत्तम होणार ह्यात शंकाच नाही.

## क्लबकारी

- अध्यक्ष सुदर्शन संवाद
- विविध विभाग संचालक किंवा कमिटी मुख्य संवाद
- क्लबमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम, फेलोशिप्स
- जावे त्यांच्या क्षेत्रा.../ मागील एखाद्या प्रोजेक्टची गोष्ट

तुमचा लेख आवर्जून द्या....
समन्वयक
आनंद / यामिनी

# दशावतार आणि उत्क्रांती (भाग २)

रो. सुभाष देशपांडे

पृथ्वीची उत्क्रांती चार युगांत विभागलेली आहे. त्यांना ईऑन्स असं म्हणतात. प्रत्येक ईऑन परत उपविभागांत विभागलेलं आहे.

पहिल्या इऑनला 'हेडिअन' युग म्हणतात. हे युग चारशे साठ वर्षांपूर्वी सुरू झालं आणि चारशे कोटी वर्षांपूर्वी संपलं.

पृथ्वी चारशे साठ कोटी वर्षांपूर्वी तयार झाली त्यावेळी ती अत्यंत गरम होती आणि तिच्यावर उल्का आपटत होत्या. त्यांपैकी एका मोठ्या उल्केनं धडक दिल्यामुळे पृथ्वीच्या काही

भागाचा चुरा होऊन तो अवकाशांत उडाला. त्या भागापासून चंद्र तयार झाला. त्यावेळी पृथ्वीच्या हवेत कार्बन डायऑक्साईडचं प्रमाण जास्त होतं.

त्यानंतर येतं 'आर्चिअन' युग. हे युग चारशे कोटी वर्षांपूर्वी सुरू झालं आणि दोनशे पन्नास कोटी वर्षांपूर्वी संपलं. याकाळात पृथ्वीचा पृष्ठभाग थंड होत चालला होता. याच काळात प्रथम एकपेशीय जीव तयार झाला. ही घटना साधारणपणे तीनशे सत्तर कोटी वर्षांपूर्वी घडली. हवेत प्राणवायूचं प्रमाण खूपच कमी होतं. ज्वालामुखीमधून् बाहेर पडणाऱ्या वाफेतून ढग तयार होऊन पाऊस पडल्यामुळे समुद्र निर्माण झाले. त्या समुद्रांत शेवाळासारख्या वनस्पती निर्माण झाल्या. या वनस्पती हवेतला कार्बन डायऑक्साईड वापरून ऑक्सिजन बाहेर टाकत होत्या. याला फोटोसिंथेसिस असं म्हणतात.

'आर्चिअन' युगानंतर आलेल्या युगाला 'प्रोटोरोझोईक' युग असं म्हणतात. हे युग अडीचशे कोटी वर्षांपूर्वी सुरू झालं आणि चोपन्न कोटी वर्षांपूर्वी संपलं. या काळात हवेतल्या प्राणवायूचं प्रमाण वाढलं. याच काळात अनेकपेशीय सजीव निर्माण झाले. प्राणवायू तयार करणाऱ्या वनस्पतींमुळे आणि जिवांमुळे हवेतल्या प्राणवायूचं प्रमाण आजच्या काळाप्रमाणे झाले.

त्यानंतरच्या युगाला 'फॅनिरोझोईक' युग असं म्हणतात. हे युग चोपन्न कोटी वर्षांपूर्वी सुरू झालं आणि ते आजपर्यंत सुरू आहे.

या लेखाच्या दृष्टीनं 'फॅनिरोझोईक' हे युग महत्त्वाचं आहे. याविषयी आपण अधिक माहिती घेऊ यात.

ङ्गफॅनिरोझोईक' युग तीन कालखंडांत विभागलेलं आहे.

त्यांतला पहिला कालखंड म्हणजे 'पॅलिओझोईक' काळ. हा काळ चोपन्न कोटी वर्षांपूर्वी सुरू झाला आणि पंचवीस कोटी वर्षांपूर्वी संपला. या काळात पृथ्वीच्या भौगोलिक परिस्थितीमध्ये, हवामानामध्ये आणि उत्क्रांती प्रक्रियेमध्ये महत्त्वाचे बदल घडून आले. या काळात वैविध्यपूर्ण जीवजंतू वेगानं तयार झाले. या प्रकाराला 'कॅमब्रिअन एक्सप्लोजन' असं म्हणतात.

इतर अनेक प्राण्यांबरोबरच समुद्री जीवसुद्धा याच काळात तयार झाले. सुरुवातीच्या काळात जीवजंतू जरी समुद्रात तयार झाले तरी नंतरच्या काळात प्राणी समुद्रातून जमिनीवर आले. सर्व भूभाग जंगलानं व्यापलेला होता. याच काळात काही कारणानं प्राणी मोठ्या प्रमाणात नष्ट झाले. प्राण्यांचं पुनरागमन होण्यास जवळजवळ दोन ते तीन कोटी वर्षं लागली.

त्यानंतर आला 'मेसोझोईक' काळ. हा काळ पंचवीस कोटी वर्षांपूर्वी सुरू झाला आणि सहा कोटी साठ लाख वर्षांपूर्वी संपला. याकाळात सरपटणारे प्राणी, सूचिपर्णी वृक्ष, डायनॉसोर्स आणि पक्षीसुद्धा निर्माण झाले. डायनॉसोर्स हे महाकाय प्राणी होते. तसंच उंदीर, घूस यांसारखे लहानलहान सस्तन प्राणीपण निर्माण झाले. हा काळ दोन मोठ्या प्रपातांमध्ये वसला होता. सुरुवातीला फार मोठ्या प्रमाणात प्राणी नाहीसे झाले आणि दुसऱ्या वेळेस महाकाय डायनॉसोर्स नष्ट झाले. बिळांत राहणारे सस्तन प्राणी आणि हवेत उडणारे पक्षी वाचले. सस्तन प्राण्यांपासून पुढे मणका असलेले पृष्ठवंशीय जीव निर्माण झाले. यामध्ये मानवपण येतो. यानंतर 'सेनोझोईक' काळ येतो जो आजसुद्धा चालू आहे. हा काळ सहा कोटी साठ लाख वर्षांपूर्वी सुरू झाला. याकाळात सस्तन प्राण्यांची भरभराट झाली. त्याचं कारण असं की, या काळाच्या सुरुवातीला पृथ्वीवर एक मोठी उल्का आदळली आणि पृथ्वीवरचे महाकाय प्राणी नष्ट झाले. जमिनीखाली राहणारे लहान सस्तन प्राणी वाचले. त्यांना इतर प्राण्यांची स्पर्धा नसल्यानं त्यांची भरभराट झाली त्यामुळे या काळाला सस्तन प्राण्यांचा काळ असंही म्हणतात.

साडेसहा कोटी वर्षांपूर्वी जे लहान सस्तन प्राणी होते त्यांच्यात उत्क्रांती होऊन हात, बोटं आणि या अवयवांचा वापर करण्याची बुद्धी विकसित झाली. याच काळात नंतर मोठ्या दातांचे वाघ, सिंह, गुरंढोरं, शेळ्यामेंढ्या आणि सुरुवातीचा मानव निर्माण झाला. मानवांमध्ये प्रगती होऊन शेती, व्यापार, उद्योगधंदे हे सगळं सुरू झालं. रानटी मानवापासून गुहेत राहणारा, शिकार करणारा, शेकोटी पेटवणारा, शेती करणारा, यंत्रं तयार करणारा, रॉकेटच्या साहाय्यानं अवकाशात जाणारा मानव इथंपर्यंत मानवाची प्रगती झाली आणि हळूहळू त्याने जग काबीज केलं.

(क्रमशः)

## चायनीज भेळ

ॲन माधवी देशपांडे



रेसिपी समजून घेण्याकरता

व्हिडिओ पाहा...

## जून, निबर भेंडीच्या दाण्यांची आमटी

ॲन मोहिनी नातू

रेसिपी समजून घेण्याकरता

व्हिडिओ पाहा...

बरं का मंडळीऽ

बहुतेकांच्या घरी भेंडीची भाजी आवडते. बाजारातून आणताना आपण अगदी कोवळी भेंडी निवडून आणतो कारण तरच ही भाजी चांगली होते. आमच्या शेतावरची भेंडी तर खूपच छान आणि कोवळी असते पण एकदा भेंडी उतरवायला उशीर झाला. चांगली पावशेरपेक्षा जास्त भेंडी अगदी जून आणि निबर झाली.

आता ही भेंडी वाया जाणार असं वाटून खूप वाईट वाटलं पण माझ्या एका मामे सासुबाईनी धीर दिला आणि म्हणाल्या, 'घाबरू नकोस. सोलून याचे दाणे काढ. मी तुला याची आमटी शिकवते. ज्येष्ठ बायकांची कोंड्याचा मांडा करायची वृत्ती चांगलीच कामी आली. अर्थात ही भेंडी अगदी पिवळी झालेली नको कारण त्यांतले दाणे चरबरीत असतात त्यामुळे भाजून पाणी घालून वाटलं तरी चोथा लागतो.

आता ही आमटी बनवायला लागणारं साहित्य बघू या मेजरींग कपनुसार सांगते.

१/२ कप – जून भेंडीचे सोललेले दाणे
१/४ कप – भाजलेले शेंगदाणे
१/४ कप – भाजलेलं सुकं खोबरं
४ ते ५ – लसूण पाकळ्या (मध्यम)
५ ते ६ – आमसूल
मीठ, गूळ, तिखट चवीप्रमाणे
फोडणीकरता तेल, जिरं, मोहरी, हिंग, कढीपत्ता आणि
अगदी थोडी हळद





आता कृती बघू या–

१) सोललेल्या भेंडीचे दाणे चमचाभर तेलावर परतून घ्यावेत. नंतर हे परतलेले दाणे, शेंगदाणे, सुकं खोबरं आणि लसूण हे सगळं गुळगुळीत, मुलायम वाटून घ्यावं.

२) आपल्या घरी आवडत असेल त्या प्रमाणात पाणी घालून पातळ करून घ्यावं.

३) चवीप्रमाणे मीठ, गूळ, लाल तिखट आणि आमसूल घालून उकळी आणावी.

४) नंतर तेलामध्ये जिरं, मोहरी, हिंग, कढीपत्ता आणि थोडीशी हळद घालून फोडणी करून घेऊन ती आमटीवर ओतावी.

दाणे वाटतानाच आपल्या चवीनुसार लाल तिखटाऐवजी हिरवी मिरची घातली तर आमटीला छान रंग येतो. कढीपत्ता आणि भेंडीचे दाणे याचाच स्वाद आमटीला पुरतो तरीही कोणाला आवडत असल्यास वरून कोथिंबीर घालावी. चांगल्या काचेच्या बाऊलमध्ये काढून सर्व्ह करावी. गरम आमटी, भात किंवा भाकरी बरोबर खूप चविष्ट लागते.










- ➢ सभासदांचा सहभाग वाढावा हा हेतू
- ➢ सभासदांच्या कलागुणांना वाव
- ➢ चित्रकला, फोटोग्राफी, कथा, लेख, कविता
- ➢ व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक गवसणी

कलाकारी

तुमचा लेख आवर्जून द्या....
समन्वयक
आनंद कुलकर्णी / यामिनी पोंक्षे

## *Book Review*


Rtn. Sanjeev Ogale

Turn the Ship Around!: A True Story of Turning Followers into Leaders

L. DAVID MARQUET

Usually, you must have seen Leaders love Followers, but a true leader creates leaders.

This book has inspired me to look within and see what did I miss out in my business plans. It was an eye-opener for me. Hope to bring in the change soon.




TURN THE SHIP AROUND
WRITTEN BY
FORMER NUCLEAR SUBMARINE COMMANDER
L. DAVID MARQUET

Normally, the Captain of a ship has a habit of giving orders, expecting all crew members to adhere to the order. Orders of the Captain are followed simply because of his experience. Captain's orders are taken as the gospel of truth and obeyed to the last word.

The Captain expects the ship to be in shape for any storms and bad weather. But in the bargain, the Captain (Leader) took the responsibility that others who are obeying his orders (followers) will take responsibility and follow duties.

This book reviews the orders given by the Captain are obeyed without any question by the specialist of each department and without giving a thought whether things can be done in a better way.

The book has twenty-nine chapters. Each chapter is about a department on the ship (submarine). Those departments are similar to the different departments in business conducted onshore. Reading about them is a learning experience.

It starts with one of the things that limit our learning, which is our belief that we already know. Therefore, by simply asking people to be proactive, to take ownership and other aspects of empowerment in lectures and programmes is just scratching the surface. Much more needs to be done to empower followers.

After every chapter, there are questions put forward by the writer for self-assessment and consideration.

The first two chapters speak about the training to take orders on a ship. In the next chapter, he is promoted to take over the ship (submarine). However, earlier ships that he has worked on have been new and upgraded to the latest equipment. Now, the ship that he is to take over is an older ship which has a poor performance record starting from the maintenance to the morale of the crew working on the ship.

A big task was laid out by the orders received from the Naval Head Quarters to sail out in the ocean and remain underwater for six months at a stretch. The Captain has to now change the ambiance and working of the crew for bringing up the maintenance of the ship so that to make his crew believe in themselves that the ship can be a real force to reckon.

The Captain also explains the different tasks that he assigned to the crew in the different departments by creating a sense of belonging among the crew members towards the ship. Further, the writer explains how the same can be interpreted and applied in an organisation.

He explained that it made a difference when the crew has given a chance to raise their concerns about the upkeep of the ship. When the smallest concern of the crew gets the attention it develops a sense of ownership and can save the ship from sinking.

The Captain also gives examples of the process where he asked each Department Head to take into confidence all the team members, by explaining all pros and cons, before taking any crucial decision. It will develop bonding and boost confidence, within the department.

The Department Heads are reminded to give a personal touch to their relationship with all the crew members and to support them in their enhancement and promotion. It is portrayed very well in the form of stories in the book.

Understanding the organisation and rules of the game have been very nicely put forward with the clarity that each member of the team has to follow.

The book also explains, the need to learn continuously, the importance of training and competency requirements which will help to make correct decisions to greater engagement, motivation and initiative.

Ultimately for any organisation, the top-down approach or Leader-Follower system may not work as it limits the authority, the initiative, the creativity, job satisfaction and ultimately teamwork.

I would recommend this book to all business leaders as a guide to create leaders within your organisation.


**दृष्टिकोन**

- **सभासदांचा वेगवेगळ्या विषयांवरचे दृष्टिकोन मांडण्याची जागा...**
- **हलकंफुलकं लेखन हवं**
- **पुस्तंक, नाटक, चित्रपट, मालिका, वेबसिरीज**
- **राजकारण, समाजकारण, चालू घडामोडी**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे**

## विशेष — मदतीसाठी पुढे या...

प्रे. रो. सुदर्शन नातू

पुण्यापासून पन्नास किलोमीटरवर असलेल्या 'पाबळ' या गावी 'व्हिलेज कम्युनिटी डेव्हलपमेंट असोसिएशन' ही सेवाभावी संस्था अत्यंत गरीब कुटुबांतल्या मुलींसाठी वसतिगृह चालवते.

आजवर दोनशे मुलींनी या सेवेचा लाभ घेतला असून सध्या सहा ते अठरा वयोगटातल्या पंधरा मुली इथे वास्तव्य करत आहेत. या मुलींच्या खाण्यापिण्याची, आरोग्यसुविधांची आणि शिक्षणाची व्यवस्था संस्था करते त्यामुळे या मुली शिक्षण घेऊ शकतात.

सध्या सर्व शाळा ऑनलाईन सुरू असल्यामुळे मुलींच्या शिक्षणात अडथळा निर्माण झाला आहे कारण त्यांना स्मार्टफोन घेणं शक्य नाही.

तरी ज्यांच्याकडे जुने, फारसे वापरात नसलेले डेस्कटॉप किंवा लॅपटॉप असतील त्यांनी ते या संस्थेला दिले तर या मुलींना शिक्षण पुढं सुरू ठेवणं शक्य होईल.

कृपया याचा विचार करावा आणि मदतीसाठी पुढे यावे ही विनंती.

## विशेष — असा मी असा मी

ऐकू या....



नमस्कार मंडळीऽ

मी योगेन्द्र नातू... गेली बावीस वर्षं रोटरी पुणे दक्षिणचा सभासद आहे. आपले माजी अध्यक्ष श्री सत्यव्रत पोंक्षे यांनी मला रोटरीचा परिचय करून दिला आणि श्री गोविंद पटवर्धन यांच्या अध्यक्षवर्षात मी सभासद झालो.

सत्यव्रत पोंक्षे यांची एक आठवण माझ्या चांगलीच लक्षात आहे. लागोपाठच्या दोन भेटींमध्ये त्यांनी मला अकियो मोरिताचं 'मेड इन जपान' आणि कोनोसुके मत्सुशिता याचं 'नॉट फॉर ब्रेड अलोन' ही दोन पुस्तकं वाचलीत का... म्हणून विचारलं. नकारार्थी उत्तर देताना मी थोडासा खजील झालो. त्यावर त्यांचा सल्ला असा होता की, इलेक्ट्रॉनिक्स हे कार्यक्षेत्र असणाऱ्या सर्वांनी ही पुस्तकं वाचली पाहिजेत. अर्थातच तेव्हापासून मी वाचनाची सवय अंगी बाणवून घेतली हे सांगणे न लगे... कदाचित याच सवयीमुळे 'वाचू आनंदे' ही फेलोशिप सुरू करण्याची प्रेरणा मिळाली असावी.

१९७१ ते १९७७ या काळात अमेरिकेत शिकागो डेट्रॉईट परिसरात माझं वास्तव्य झालं... सुरुवातीला एमएसइइपर्यंतच्या शिक्षणासाठी 'युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगन'मध्ये आणि नंतर एक वर्ष जनरल मोटर्समध्ये नोकरीसाठी

१९७४ साली डिसेंबरमध्ये माझ्या वडलांची एकसष्टी होती म्हणून तीन आठवडे भारतात आलो होतो... पण तेवढ्या अवधीत दोनाचे चार हात झाले आणि मी लगेच परत गेलो.

आमच्या लग्नाची गोष्ट आणि पुढे १९८८ला दूरदर्शनवर आलेली 'मिस्टर योगी' ही मालिका यांमध्ये बरंचसं साम्य आहे.

मी १९७७मध्ये भारतात परत आलो आणि १९८३पर्यंत एआरएआय, बजाज ऑटो आणि मॉरिस इलेक्ट्रॉनिक्स या कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या पदांवर नोकऱ्या केल्या. १९८३मध्ये आमची 'ऑटो इलेक्ट्रॉनिक' ही कंपनी भागीदारीत सुरू केली. मोहिनी, मी आणि आमचे भागीदार यांनी पूर्णवेळ कंपनीचा ध्यास घेऊन काम केलं. दुचाकी आणि तीनचाकी गाड्यांना लागणाऱ्या इलेक्ट्रॉनिक

पार्ट्सचं उत्पादन आमच्या कारखान्यात व्हायचं. यांतल्या साईड इंडिकेटरला म्हणजे फ्लॅशरला स्वदेशीकरणाचं 'पारखे पारितोषिक'ही मिळालं आहे. पाच माणसं आणि पाचशे स्क्वेअर फूटमध्ये सुरू केलेली भागीदारीतली ही छोट्याशा कंपनीनं दहा वर्षांत एकशे ऐंशी कर्मचारी आणि दहा हजार स्क्वेअर फूट जागा अशी प्रगती केली. मी भागीदारीमध्ये कंपनी सुरू करून यशस्वीपणे चालवून दाखवली याचा सार्थ अभिमान बाळगतो. आणखी एक गोष्ट अशी की, ही कंपनी आम्ही पूर्णपणे शून्य कर्जात चालवली.

२०१६ साली कंपनी विकून आम्ही बाहेर पडलो पण कंपनी आजही त्याच जागी, त्याच कामगारांबरोबर अगदी सुरळीत सुरू आहे.

आमची दोन्ही मुलं, मंदार आणि मंगेश आणि दोन्ही सुना, प्रीती आणि दीप्ती– चौघंही उच्चशिक्षित आहेत. त्यांच्या–त्यांच्या कार्यक्षेत्रांत यशस्वी आहेत. मंदार आणि त्याचे कुटुंबीय टेक्सासमध्ये प्लेनो प्रांतात राहतात तर मंगेश आणि त्याची फॅमिली पुण्यामध्ये आमच्या जवळच असते.

निवृत्त आयुष्यात दोनतीन गोष्टी करायची इच्छा आहे. रोटरीच्या मदतीनं वाचनसंस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करता आला तर हवा आहे. ही इच्छा बऱ्याच अंशी पूर्ण होताना दिसतीये. आरोग्याकरता निसर्गोपचारांवर आणि सेंद्रिय शेती करण्यावर लक्ष देऊन अभ्यास आणि व्यासंग वाढवता आला तर तेही करायचं आहे.

बाकी इश्वरेच्छा बलियसी...!

**व्हिडिओ पाहा....**

## विशेष

- **शुभेच्छा**
- **स्मृती**
- **गवसणी**
- **या महिन्यात मागच्या वर्षांत...**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**श्वेता करंदीकर**

## टीम बुलेटिन

## सदरं

- **मुखपृष्ठ ..........................श्वेता.............. विधानं/ कोट्स**
- **संपादकीय/ अध्यक्षीय........योगेश /सुदर्शन**
- **रोटरी..........................योगेंद्र / अभिजित............... रोटरी मंच/RI**
- **डिस्ट्रिक कनेक्ट...........योगेंद्र / अभिजित........ डिस्ट्रिक घडामोडी**
- **क्लबकारी.........................आनंद / यामिनी..........क्लब घडामोडी**
- **कलाकारी........................आनंद / यामिनी..........सभासद गुणदर्शन**
- **दृष्टीकोन.......................योगेंद्र / अभिजित..........पुस्तक, चित्रपट इ.**
- **विशेष............................श्वेता....................शुभेच्छा, स्मृती**